दैनिक
# रायगड नगरी
अन्यायाचा प्रतिकार | महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २५५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.१० डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# पनवेलच्या सर्वांगिण विकासासाठी राजकीय इच्छा शक्ती असणे महत्वाचे : उपमुख्यमंत्री

## पोलिसांनी चिरीमिरी घेणे सोडून वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवावा : ना.अजित पवार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेलचा विकास चहुबाजूने होत असल्याने अनेक अडीअडचणींचा सामना करावा लागत आहे. महानगरपालिका त्या दृष्टीने ठोस पाऊले उचलत असली तरी सर्व राजकीय पक्षांची इच्छाशक्ती या विकासाला महत्वाची आहे. तरी राजकारण निवडणुकीपुरतेच करू इतर वेळी पनवेलचा विकास कसा होईल यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा, असे आवाहन आज पनवेल येथील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित केलेल्या आढावा बैठकीत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.**

या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री आदिती तटकरे, खा.सुनील तटकरे, आ.बाळाराम पाटील, आ.शशिकांत शिंदे, आयुक्त गणेश देशमुख, नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह, सिडकोचे अधिकारी संजय मुखर्जी, मा.नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे, नवी मुंबई राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे निरीक्षक प्रशांत पाटील, विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, शिवसेना जिल्हाप्रमुख शिरिष घरत, जिल्हा सल्लागार बबन पाटील, काँग्रेस जिल्हाध्यक्ष आर.सी.घरत, रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, नगरसेवक सतीश पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील, महिला आघाडीच्या भावना घाणेकर, कार्याध्यक्ष शिवदास कांबळे, सुनील मोहोड, राष्ट्रवादीचे नेते ताहिर पटेल आदींसह विविध विभागातील शासकीय अधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

यावेळी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी पनवेल महानगरपालिकेसंदर्भातील विविध विकास कामांचा लेखाजोगा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर मांडला. त्याचप्रमाणे महानगरपालिका उभारत असलेली ११० कोटीची भव्य इमारत, विविध महानगरपालिका वॉर्ड कार्यालये, विविध शासकीय योजना त्याचप्रमाणे कोव्हीड काळात उभारण्यात आलेले जम्बो कोव्हीड सेंटर, रस्ते, पाणी, नागरी सोयी–सुविधा याबाबतची माहिती त्यांनी दिली. अनेक गोष्टी सिडकोकडे असल्याने व कित्येक प्लॉट हे अद्यापपर्यंत हस्तांतरीत न झाल्याने विकासकामे रेंगाळल्याचेही यावेळी दिसून आले. या सर्व गोष्टींची दखल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेवून आगामी काळात सिडको व पनवेल महानगरपालिकेने एकत्रितपणे येवून पनवेलकरांना जास्तीत जास्त चांगल्या सोयीसुविधा द्याव्यात या संदर्भात आवश्यक त्या सूचना भर बैठकीमध्ये मोबाईलद्वारे संबंधित अधिकारी वर्गांना त्यांनी दिल्या. शासन पूर्णपणे पनवेल महानगरपालिकेच्या




**नैना प्रश्नासंदर्भात त्यांनी आढावा घेवून सिडकोला त्याबाबत योग्य उपाययोजना करण्याचे सांगितले. अन्यथा या भागातील लोकांच्या नैना रद्द करण्याच्या मागणीच्या रेट्यापुढे शासनाला योग्य निर्णय घ्यावा लागेल असा इशाराही सिडकोच्या उपस्थित अधिकाऱ्यांना दिला.**

पाठीशी उभे आहे. कोणत्याही प्रकारे विकासकामे रेंगाळली नाही पाहिजेत, असे अजित पवार यांनी सांगून या मुलभूत सुविधांबरोबर अत्याधुनिक स्टेडियम, ४०० मीटर रनिंग ट्रॅक, वाहतूक कोंडी सोडविण्यासंदर्भात उपाय योजना, झोपडपट्टी विभागासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वेगवेगळ्या योजना राबविणे, पंतप्रधान आवास योजनेंतर्गत गरीबांना फायदा करून देणे या संदर्भात त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच पनवेलकरांना भेडसाविणाऱ्या दुहेरी करासंदर्भात सुद्धा हा धोरणात्मक निर्णय लवकरच घेण्यात येईल, असे सुतोवाच त्यांनी केले.

ग्रामीण भागातील पाणी प्रश्नासंदर्भात पाणी पुरवठा विभागाला आवश्यक त्या सूचना त्यांनी केल्या. तसेच देहरंग धरणाची पातळी वाढविणे व पनवेल शहर व ग्रामीण भागासाठी इतर ठिकाणावरुन पाणी पुरवठा करण्यासंदर्भात सुद्धा उपस्थित अधिकाऱ्यांशी चर्चा त्यांनी यावेळी केली. तसेच संबंधित सर्व प्रश्न निकाली काढण्यासंदर्भात त्या–त्या खात्याने लवकरात लवकर या संदर्भात माहिती शासनाला द्यावी, असेही त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे पनवेल–जेएनपीटी रोड, कळंबोली स्टील मार्केट व अनेक ग्रामीण भागात विना परवाना पार्कींग झोन तयार करण्यात आले आहेत. सदर पार्कींग झोनवर तातडीने कारवाई करावी व वाहतूक कोंडीचा प्रश्न त्वरित सोडवावा, अशा सुचना सुद्धा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह यांना भर बैठकीत दिल्या. यावेळी पनवेल परिसरातील विविध सामाजिक संस्था, संघटना आदींनी आपल्या परिसरातील नागरी प्रश्ना संदर्भात निवेदने सादर केली. त्याचे तातडीने निराकरण केल्याने महाविकास आघाडीच्या कामाचे सर्वांनी कौतुक केले आहे.

> नागरी प्रश्नाबाबत सिडको व पनवेल महानगरपालिका यांच्यात कट्टीबट्टी आहे का? हे मला समजत नाही हे या दोघांनी एकत्रित येवून प्रश्न सोडविणे गरजेचे आहे.
>
> जे अधिकारी आजच्या बैठकीला सांगून सुद्धा उपस्थित राहिले नाहीत त्यांची येत्या सोमवारी अधिक माहिती घेतली जाईल.
>
> पोलिसांनी चिरीमिरी घेणे सोडून द्यावे, वाहतूक कोंडीचा प्रश्न पहिला सोडवावा, हेल्मेट वर कारवाई करणे आता तरी थांबवा.
>
> **ना.अजित पवार, उपमुख्यमंत्री**

## करंजा मच्छीमार बंदरात कमी उंची अभावी मच्छिमार बोट अडकून नुकसान

**दै.रायगड नगरी । उरण**

सातत्याने मागणी करुनही अद्यापही करंजा मच्छीमार बंदराची उंची वाढविण्यासाठी दिरंगाई केली जात असल्याचा फटका येथील मच्छीमारांना बसु लागला आहे काल सकाळी एक मच्छीमार बोट कमी उंचीमुळे बंदरातील जेट्टीवर अडकुन पडली. यामुळे बोटीचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. तरी भविष्यात अशा घटना घडून मच्छीमारांचे नुकसान टाळण्यासाठी बंदराची उंची वाढविण्याच्या कामाबाबत तत्काळ निर्णय घेण्याची मागणी करंजा मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष भालचंद्र कोळी यांनी केली आहे.



क्षमतेपेक्षा कितीतरी अधिक पटीने ससुनडॉक बंदरात मच्छीमार बोटी येत असल्याने मोठी गर्दी होते. यामुळे बंदरावर मोठा ताण पडत असल्याने मच्छीमारांना अनेक समस्यांना सामोरे जाण्याची पाळी येते. त्यामुळे ससुनडॉक बंदरावरील वाढता ताण दूर करण्यासाठी आणि मुंबई, पालघर, ठाणे, रायगड जिल्ह्यातील मच्छीमारांना होणारा त्रास कमी करण्यासाठी रायगड जिल्हयातील करंजा खाडी किनारी एक हजार मच्छीमार बोटी लागण्याची क्षमतेचे अत्याधुनिक बंदर उभारण्यात येत आहे. मागील नऊ वर्षांपासून १५० कोटी खर्चाच्या करंजा मच्छीमार बंदराचे काम अद्यापही रखडत – रखडत सुरू आहे.

मात्र या मच्छीमार बंदराची उंची समुद्राच्या उधाणाच्या भरतीच्या पाण्यानंतरही करंजा बंदराच्या जेट्टीची उंची साधारणतः अडीच फूट अडीच फूट राहणे आवश्यक आहे.या घडीला मात्र समुद्राच्या उधाणाच्या भरतीनंतर जेट्टीची उंची दीड फुटांपर्यंतच राहात आहे. यामुळे भरतीमध्ये जेट्टीच्या कमी उंचीमुळे मच्छिमार बोटींचे मोठ्या .../२

## पाली बाजारपेठेत घरफोडी ; १ लाख ४७ हजारांचा मुद्देमाल व रोख रक्कम लंपास


**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पाली बाजारपेठेतील अमोल किशोर गुप्ता यांच्या घरात घरफोडी झाली आहे. या घरफोडीत एकूण १ लाख ४७ हजारांचा मुद्देमाल व रोख रक्कम लंपास करण्यात आली आहे. ही घटना मंगळवारी (ता.७) सायंकाळी ४ ते बुधवारी (ता.८) पहाटे १२:३० च्या सुमारास घडली आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी व पाली पोलीस निरीक्षक विजय तायडे यांनी बुधवारी (ता.८) रात्री लगेच घटनास्थळी भेट दिली.

चोरट्यांनी गुप्ता यांच्या घराच्या पाठीमागील लोखंडी दरवाजाचे कुलूप काढून त्यावाटे घरात प्रवेश केला. आणि घरातील लोखंडी कपाटात ठेवलेल्या सोन्याच्या वस्तू व रोख रक्कम काढून पोबारा केला आहे. यामध्ये ७२ हजारांचे दागिने (१४ व १२ वर्षांपूर्वीच्या किंमतीनुसार) व ७५ हजार रोख रकमेचा समावेश आहे. या प्रकरणाचा अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी व पाली पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित साबळे करीत आहेत.

## संक्षिप्त...

### बिपीन रावत यांचे पार्थिव दिल्लीत; नरेंद्र मोदींनी वाहिली श्रद्धांजली



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशाचे पहिले संरक्षण दल प्रमुख बिपीन रावत यांचे पार्थिव तामिळनाडूतून दिल्लीत आणण्यात आले असून पालम एअरबेस येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रावत यांना श्रद्धांजली वाहिली. बिपीन रावत यांच्या पार्थिवाला पंतप्रधानांनी झुकून वंदन केले. पालम एअरबेसवरील दृष्ये पाहून अवघ्या देशाचा कंठ दाटून आला.

बिपीन रावत, त्यांची पत्नी मधुलिका रावत आणि अन्य अधिकारी अशा १३ जणांचा बुधवारी तामिळनाडूतील कुन्नूर येथे हेलिकॉप्टर कोसळून झालेल्या दुर्घटनेत मृत्यू झाला. या सर्वांचे पार्थिव आज सुलूर एअरबेस येथून भारतीय हवाई दलाच्या विमानाने दिल्लीत आणण्यात आले. दिल्लीतील पालम एअरबेस येथे रात्री आठ वाजता हे विमान दाखल झाले. तिथे जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवल, तिन्ही दलांचे प्रमुख अशा प्रमुख व्यक्तींनी रावत यांच्यासह त्यांची पत्नी व इतर अधिकाऱ्यांना श्रद्धांजली वाहिली.

### रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुल (सिबीएसई), मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत

## कनिष्ठ महाविद्यालयाच्या इमारतीचे भूमीपूजन




**दै.रायगड नगरी । पनवेल**

दर्जेदार शिक्षणासोबत कला, क्रीडा, सामजिक क्षेत्रातही उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या नामवंत अशा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे नोड मध्ये असलेल्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत कनिष्ठ महाविद्यालयाच्या तसेच नव्याने सुरु होणाऱ्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुल (सिबीएसई) या विद्यालयांच्या नविन इमारतीचे भूमिपूजन संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज झाले.

थोर समाजसुधारक स्वर्गीय जनार्दन भगत यांच्या कार्याने प्रेरित होऊन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी १९९२ साली जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची स्थापना केली. दर्जेदार शिक्षण आणि अत्यंत शिस्तप्रिय संस्था म्हणून या संस्थेचे नावलौकिक आहे. सर्व स्तरातील दर्जेदार शिक्षण देण्याचे आणि अनेक करिअर आधारित पारंपारिक आणि वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमांसह प्रभावी शिक्षण आणि शिकण्याची सुविधा या संस्थेच्या माध्यमातून होत आधुनिकीकरणाच्या युगात प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षण देण्यासाठी हि संस्था काम करीत आहे. या संस्थेचे सीकेटी महाविद्यालय (स्वायत्त), भागुबाई चांगू ठाकूर विधी विद्यालय, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुल खारघर, या व अशा इतर विद्यालयांप्रमाणे रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुल (सिबीएसई), मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत कनिष्ठ महाविद्यालय अविभाज्य घटक आहे. गोर गरिबांना शिक्षण मिळावे यासाठी अथक प्रयत्नाने गव्हाण विभागात २५ वर्षांपूर्वी अतिशय सुंदर अशी वास्तू बांधून शिक्षण प्रसाराचे अविरत कार्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकुर यांनी चालू ठेवले आहे. काळाची गरज .../२

> या जागेच जागेच एक अनन्य साधारण महत्व आहे. येत्या ४ वर्षात या इमारतीचे काम पूर्ण होईल.त्यामुळे जसे पहिले इंग्लिश स्कूल या परिसरात सुरु झाले तश्याच प्रकारे या पहिल्या सीबीएसई स्कूलला प्रतिसाद मिळेल व दर्जेदार असे शिक्षण मिळेल.
>
> **- माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर**

## चाणजे शेतकरी संघर्ष समिती हायकोर्टात जनहित याचिका दाखल करणार : अविनाश म्हात्रे

**दै.रायगड नगरी । उरण**

विविध मागण्या संदर्भात सिडको कार्यालय द्रोणागिरी येथे आमरण उपोषण संदर्भात सिडको व्यवस्थापन सोबत झालेल्या मीटिंगमध्ये चाणजे शेतकरी संघर्ष समितीच्या मागण्या मार्गी लागण्या संदर्भात खालील निर्णय घेण्यात आले.

समुद्राचे पाणी व खारफुटीचे अतिक्रमण थांबवणे संदर्भात :– ज्या ज्या वेळी खारफुटी कार्यालयाकडून सिडको प्रशासनास फ्लॅप गेट काढण्याचे आदेश येतील त्या त्या वेळी सिडको प्रशासन चाणजे शेतकरी संघर्ष समितीस कळवतील व त्याप्रमाणे सदर संघटना कारवाई करणार.तसेच फ्लॅप गेट कायमस्वरूपी ठेवण्यासाठी चाणजे शेतकरी संघर्ष समिती सर्व बाधित शेतकऱ्यांच्या वतीने हाय कोर्ट मध्ये जनहित याचिका (झखङ) दाखल करणार आहे.

साकव/खारबंड सुरक्षितेसाठी हाईट गेज पूर्ववत करणे संदर्भात दि.८/१२/२०२१ रोजी सिडकोकडून चाणजे शेतकरी संघर्ष समितीस दिलेल्या पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, आपल्या जमिनीवर असलेला साकव /खारबंड हा सिडकोने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डच्या विनंती नुसार करंजा टर्मिनल कंपनीस हस्तांतर केला आहे, यावरून करंजा टर्मिनल,सिडको व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचे साटेलोटे उघड झाले आहे. हा सर्व भ्रष्टाचार उघड करण्यासाठी चाणजे शेतकरी संघर्ष समिती हायकोर्ट मध्ये जनहित याचिका दाखल करणार आहे. तसेच सर्व पुरावे गोळा करून करंजा टर्मिनल कंपनी व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्याविरुद्ध स्थगित केलेले आमरण उपोषण नवीन जोषाने सुरू करण्यात येणार असल्याचे तसेच आमरण उपोषण आंदोलन तात्पुरते पुढे ढकलण्यात आले असल्याची माहिती अध्यक्ष अविनाश म्हात्रे यांनी दिली.

सिडको प्रशासनासोबत झालेल्या .../२

> आता या सर्व प्रकारा विरोधात हायकोर्ट मध्ये जनहित याचिका दाखल करण्याचे ठरले आहे. तसेच आरटीआय द्वारे काही पुरावे गोळा करून स्थगित आमरण उपोषण साकव समोर करंजा टर्मिनल कंपनी विरुद्ध करण्यात येणार आहे.
>
> **-अविनाश म्हात्रे,**
> **अध्यक्ष -चाणजे शेतकरी संघर्ष समिती**



# ॲड.प्रविण ठाकूर यांच्या कार्यालयाचे उद्‌घाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्ह्यातील नामवंत वकील म्हणून ख्याती असलेल्या ॲड.प्रविण ठाकूर यांच्या कार्यालयाचे उद्घाटन आज पनवेल महानगरपालिका जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष आर सी घरत व प्रसिद्ध उद्योजक पी पी खारपाटील यांच्या हस्ते झाले.



पनवेलच्या नित्यानंद मार्गावर जिल्हा न्यायालयाजवळ ॲड.प्रविण ठाकूर यांनी आपले नवीन कार्यालय सुरू केले आहे. या कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या उपाध्यक्ष तथा माजी महिला कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष चारूलता टोकस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी सरचिटणीस व रायगड जिल्हा प्रभारी श्रीरंग बरगे, माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, रायगड जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष महेंद्र घरत, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सुरदास गोवारी, ड.प्रफुल्ल म्हात्रे, सचिन लक्ष्मणशेठ म्हात्रे, पद्माकर वाकडीकर, शांताराम पाटील, सुधाकर पाटील, रईस पटेल, राम पाटील, नाना प्रधान, रवींद्र ठाकूर, तुषार पाटील, विलास पाटील,मनोहर पाटील, सुधीर पुगावकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# शिवसेनेची स्वबळ एक्स्प्रेस सुसाट ; एका जागेवर बिनविरोध विजय होण्याची शक्यता

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायतीत उमेदवारी अर्जांची छाननी झाल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांनी एकमेकांसमोर दंड थोपटले आहेत.सत्ताधारी शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस, भाजप, शेकाप, मनसे, वंचित बहुजन आघाडी यांनी आपले उमेदवार या निवडणूकीसाठी उभे केले आहेत. यामध्ये शिवसेनेची स्वबळ एक्सप्रेस सुसाट असुन सतरा जागांपैकी पंधरा जागी शिवसेनेचे उमेदवार उभे असून दोन ठिकाणी शिवसेना पुरस्कृत उमेदवार उभे करण्यात आले आहेत. यामध्ये जोगवाडी येथून शिवसेना पुरस्कृत अपक्ष उमेदवार मंगेश गणपत पोलेकर यांच्यासमोर प्रतिस्पर्धी उमेदवाराचा अर्ज आलेला नसल्याने त्यांची बिनविरोध निवड होणार असल्याचे पक्के झाले आहे. त्यामुळे शिवसेनेची विजयी घोडदौड सुरू झाली आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस ने गाजावाजा करत आपले उमेदवारी अर्ज भरले असले तरी १७ जागांपैकी त्यांनी केवळ १३ जागांवर उमेदवारी अर्ज भरले आहेत. या १३ जागांपैकी ना.मा. प्र. आरक्षण पडलेल्या ४ प्रभागात निवडणूक होणार नसल्याने याचा मोठा फटका राष्ट्रवादी कॉंग्रेसला बसणार आहे कारण या चार प्रभागातील तीन विद्यमान नगरसेवक हे राष्ट्रवादी कॉंगेस पक्षाचे आहेत. प्रभाग क्रमांक १५ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार चंद्रकांत भोरावकर यांना ग्रामस्थांनी बिनविरोध देण्याची चर्चा सुरू होती परंतु अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी शिवसेनेकडून या प्रभागात उमेदवारी अर्ज दाखल करून राष्ट्रवादी कॉंग्रेसला अडचणीत आणले आहे.

प्रभाग क्रमांक ९ मध्ये शिवसेनेकडून हरकत घेतल्या नंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी ती हरकत फेटाळली या निर्णया विरुद्ध शिवसेनेकडून माणगाव उपजिल्हा न्यायालयात अपील करण्यात आले आहे शिवसेनेने दावा केला आहे की प्रभाग क्रमांक ९ मधील उमेदवाराचा अर्ज बाद होणार आज संध्याकाळ पर्यंत निकाल अपेक्षित आहे परंतु जर या प्रभागातील उमेदवार बाद झाला तर याचा मोठा फटका राष्ट्रवादी कॉंग्रेसला या निवडणुकीत बसू शकतो.राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असले तरी तळा शहरात शिवसेना राष्ट्रवादी कॉंग्रेस हे पारंपारिक राजकीय शत्रू आहेत. आतापर्यंत दोन्ही पक्ष नेहमीच आमने-सामने राहिले आहेत. गत निवडणुकीतही शिवसेना राष्ट्रवादी अशी दुरंगी लढत झाली होती. त्यामध्ये शिवसेना ११ राष्ट्रवादी ५, आणि अपक्ष (राष्ट्रवादी पुरस्कृत )१ असे नगरसेवक निवडून आले होते.

ज्येष्ठ नेते रविभाऊ मुंढे यांच्या भाजपा प्रवेशाने भाजपाची ताकत वाढली आहे. त्यांच्याच नेतृत्वाखाली भाजप निवडणूक लढवणार आहे. शिवसेना नेत्यांनी स्वबळाचा नारा दिला आहे, शेकाप, वंचित बहुजन आघाडी मनसे यांनी देखील उमेदवार उभे केले असल्याने नगरपंचायतीवर सत्ता सहज मिळावी यासाठी अंतर्गत आघाडी व युतीसाठी बोलणी सुरू असल्याचे बोलले जात आहे. याचा फटका कोणाला बसणार यावर नगरपंचायतीचा निकाल अवलंबून राहील तूर्तास शिवसेनेची स्वबळ एक्स्प्रेस सुसाट असून एका जागेवर बिनविरोध विजय होण्याची शक्यता आहे.

# जिल्ह्यात दि.११ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या सूचनेनुसार रायगड जिल्ह्यामध्ये दि.११ डिसेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती दिवाणी न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग श्री.संदीप वि.स्वामी यांनी दिली आहे.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये न्यायालयात प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, १३८ एन.आय.ॲक्ट, खालील प्रकरणे, दिवाणी अपिले. तसेच तडजोडपात्र नगरपालिका व ग्रामपंचायत यांच्या घरपट्टी व पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, वीजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या लोकअदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत. राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये प्रलंबित प्रकरणे तडजोडीने निकाली केल्यास संपूर्ण कोर्ट फिस परत मिळते तसेच प्रलंबित व वादपूर्व प्रकरणातील निकालाविरुध्द अपिल होत नाही. त्यामुळे पक्षकारांचा बराच वेळ व खर्च वाचतो, पक्षकारांना जलद व तात्काळ न्याय मिळतो. त्यामुळे दि.११ डिसेंबर २०२१ रोजी रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग श्रीमती विभा प्र. इंगळे यांनी केले आहे.

# कसईशेत गुरे चोरी प्रकरणातील आरोपीचा पाली पोलिसांनी लावला छडा

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यासह जिल्ह्यातील अनेक भागात मध्यरात्री गुरांना गुंगीचे इंजेक्शन देऊन चोरी करणारी टोळी सक्रिय झाल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये चिंता व भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुधागड तालुक्यातील कसईशेत गावातील ८ गुरे शुक्रवारी (ता.३) चोरीला गेली होती. तर अनेक गुरे बेशुद्धावस्थेत पडली होती. बुधवारी (ता.८) या प्रकरणातील एका आरोपीला जांभूळपाडा पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. त्याला रोहा कनिष्ठ न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. अशी माहिती जांभूळपाडा पोलीस दुरक्षेत्रमधून देण्यात आली सुधागड तालुक्यातील परळी व जांभुळपाडा विभागात गुरांना गुंगीचे इंजेक्शन देऊन बेशुध्द करून चोरून नेणारी टोळी सध्या कार्यरत झाली आहे. शेतकरी परशुराम निरगुडा यांनी यासंदर्भात तक्रार दिली होती. गुरे चोरणार्या टोळीचा कायमचा बंदोबस्त करावा, कठोर शिक्षा करावी जेणेकरून त्यांची पुन्हा असे कृत्य करण्याची हिंमत होणार नाही अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## करंजा मच्छीमार बंदरात कमी उंची अभावी मच्छिमार बोट अडकून नुकसान

प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता करंजा मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष भालचंद्र कोळी यांनी या आधीच वर्तवली होती. यासाठी करंजा मच्छीमार बंदराची उंची आणखी पाच फुटांनी वाढविण्याची मागणी मत्स्यव्यवसाय व बंदर विकास मंत्री अस्लम शेख व खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे करण्यात आली होती.

बारणे यांनीही सबंधित केंद्रीय मंत्र्यांची भेट घेऊन उंची वाढविण्याची मागणी केली होती. मात्र याकामी दिरंगाई झाल्याने काल बुधवारी ८ डिसेंबर रोजी सकाळी एक मच्छीमार बोट जेट्टीवर अडकून पडली होती.जेट्टीवर अडकून पडलेल्या बोट ओहोटीच्या पाण्याबरोबर खाली कोसळून बोटीचे नुकसान झाले आहे. भविष्यात अशा प्रकारच्या अपघाताच्या घटना घडू नयेत यासाठी करंजा मच्छीमार बंदराची उंची तत्काळ वाढविण्याची मागणी करंजा मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष भालचंद्र कोळी यांनी केली आहे.

## कनिष्ठ महाविद्यालयाच्या इमारतीचे भूमीपूजन

लक्षात घेता उच्च दर्जाचे शिक्षण देण्यासाठी भव्य दिव्य शिक्षण संकुलाचे स्वप्न त्यांनी पाहिले आणि ते सत्यात उतरवण्याचे काम केले.गेल्या अनेक वर्षांपासून मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत कनिष्ठ महाविद्यालय उलवे नोड मध्ये शिक्षण दानाचे पवित्र काम करीत आहे, आणि त्याच ठिकाणी रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुल (सिबीएसई) हे विद्यालयही कार्यान्वित होत आहे. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखून सर्वसुविधायुक्त अशी इमारत उभारली जाणार आहे.

या भूमिपूजन सोहळ्यास जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, कार्यकारी मंडळ सदस्य व पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, संजय भगत, अजय भगत, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरेश्वर म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, न्हावे माजी सरपंच चंद्रकांत भोईर, व्ही.के.सिंग, भार्गव ठाकूर, विश्वनाथ कोळी, जयवंत देशमुख, राधाताई ठाकूर, दर्शन ठाकूर, वसंत पाटील, दशरथ ठाकूर,अनंता ठाकूर, एम. डी. खारकर, सागर ठाकूर, सुधीर ठाकूर, कमलाकर देशमुख, कमलाकर घरत, मिनाक्षी पाटील, किशोर पाटील, साईचरण म्हात्रे, श्रीकांत भगत, सुनीता घरत, ग्रामपंचायत सदस्या योगिता भगत, तुकाराम नारायण घरत कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या एस. ए. डोईफोडे, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्राचार्या गोळे मॅडम, लेखापाल सुवर्णा चौधरी, सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर, यांच्यासह पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चाणजे शेतकरी संघर्ष समिती हायकोर्टात जनहित याचिका दाखल करणार

सभेमध्ये सिडको प्रशासनाने चाणजे शेतकरी संघर्ष समितीस सांगितले तसेच समितीस दिलेल्या पत्रात त्यांनी स्पष्टपणे नमूद केले की, सिडकोने संबंधित साकव/ खारबंड जो शेतकऱ्यांच्या जमिनीत आहे त्या जमीन संपादित न करता महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड च्या सांगण्यावरून करंजा टर्मिनल कंपनीस परस्पर हस्तांतर केला आहे.त्या अनुषंगाने संघटनेचे आमरण उपोषण स्थगित करण्यात आले.

---

Hon'ble Godase Madam

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION. AT PAPTVEL

MISC. PETITION NO. 1773 OF 2021

Exh : 7/D

1) SYLVIA JAWAHAR FERNANDO
Residing at Flat No. 705, Solgem Tower, Plot-22, Sector-25, Kamothe
Navi Mumbai-410209
2) JEMITON JAWAHAR FERNANDO
Residing at Flat No. 705, Solgem Tower, Plot- 22,Sector- 25,Kamothe,
Navi Mumbai-410209
3) FIONA JAWAHAR FERNANDO
Residing at Flat No. 705, Solgem Tower, Plot- 22,Sector- 25,Kamothe,
Navi Mumbai410209 Petitioners

That 1) SYLVIA JAWAHAR FERNANDO, 2) JEMITON JAWAHAR FERNANDO, 3) FIONA JAWAHAR FERNANDO are the Legal Heirs or Lineal Descendant's of JAWAHAR JAMES FERNANDO, the deceased abovenamed who died at Hiranandani Hospital, Vashi, Navi Mumbai, on 24th day of July, 2020 and in the property description is in the name of the disease is attached.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

**50% undivided share in Flat No.705, Seventh Floor, about 55.97 Sq.mts area and 4.645 Sq.mts Open Terrace in the building Known as " SOLGEM TOWER", on Plot No. 22, Sector-25 Kamothe , Navi Mumbai- 410209.**

You the member of public are hereby given notice to appear in the Court Of Civil Judge, Panvel in personal or by pleader duly instructed to file your Say/Objection in any within 30 (thirty)days from the date of publication of this public notice and which is the application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided. Given under the hands and Seal of this court of this 09 th 12/2021

Sd/-
Clerk
Civil Court Senior
Division Panvel

Court Seal

Sd/-
Assit.Superitent.
Civil Court Senior
Division Panvel

---

अर्जदार तर्फे वकील
श्री.पराग दत्तात्रय म्हात्रे
रा.मु.८/बी, खोपकर अपार्टमेंट,
कुंभारवाडा, ता.उरण, जि.रायगड

**जाहीर नोटीस**

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर, यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१३४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०९/०२/२०२२

श्री.रत्नकांत रामचंद्र पाटील, वगैरे — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, कै.रामचंद्र दामू पाटील यांचे दि.०३/१२/२००८ रोजी डी.वाय.पाटील हॉस्पिटल, नवी मुंबई येथे निधन झाले आहे. त्यास वारस असलेबाबत दाखला मिळणेकरिता १) श्री.रत्नकांत रामचंद्र पाटील-मुलगा, २) श्रीमती.बारकू रामचंद्र पाटील-पत्नी, ३) श्री.हेमंत रामचंद्र पाटील-मुलगा, ४) सौ.सुनंदा रामचंद्र पाटील उर्फ सुनंदा दशरथ बंडा-मुलगी, ५) सौ.पवित्रा रामचंद्र पाटील उर्फ पवित्रा यशवंत पाटील-मुलगी यांनी मे.दिवाणी न्यायालय, उरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

कै.रामचंद्र दामू पाटील यांच्या सामाईक मालकीच्या मिळकती मौजे : पाणजे, ता.उरण, जि.रायगड येथे होत्या. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**१) मौजे : पाणजे, युनिट केस नं.११२/८६-८७**

| अ.क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नंबर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | ३ | ५ | ०-०३-५ |

त्यांचे वारसाबाबत, कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्याने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये मुदतीत हरकती न आल्यास हे मे.कोर्ट कै.रामचंद्र दामू पाटील यांचे वारसदार आहेत असे वारस असल्याबाबत त्यांना हा वारस दाखला मंजूर करेल.

आज दि. रोजी मे.कोर्टाच्या सही शिक्क्यानिशी देण्यात आली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

---

मा.गोडसे सो

ॲड.संगम प्रकाश सावंत

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो.(क) स्तर यांचे कोर्टात

चौ.अर्ज क्र.१०८२/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१०/०१/२०२२

१) श्री.दिनेश शंकर कांबळे
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्रीमती.पार्वती शंकर कांबळे
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
३) श्री.स्वप्नाली शंकर कांबळे
वय : २६ वर्षे, धंदा : नोकरी
४) सौ.पुनम मंगेश आवले
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
रा.शांतीकुज को.ऑ.हौ.सो.लि., रुम नं.सी २०२,
प्लॉट नं.१४ डी, खारघर, नवी मुंबई ४१०२१० — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, वरील अर्जदार क्र.१ यांचा मुलगा, अर्जदार क्रं.२ यांची पत्नी, अर्जदार क्रं.३ यांचा मुलगा, अर्जदार क्रं.४ यांचा मुलगा यांचे वडील कै.शंकर गेनबा कांबळे यांचा मृत्यू दि.२८/११/२००१ रोजी नायर रुग्णालय मुंबई येथे मृत्यू झाला आहे. त्यांचे मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकत**
**शांतीकुंज को.ऑ.हौ.सो.लि., रुम नं.सी २०२,**
**प्लॉट नं.१४ डी, खारघर, नवी मुंबई ४१०२१०**

येणेप्रमाणे सदनिका ही मिळकतीचे वर्णन असून सदरहू सदनिकेचे अनुषंगाने वास दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी मे.न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे कै.शंकर गेनबा कांबळे यांचे वारस नाहीत असे अगर यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.न्यायालयात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन मे.न्यायालय अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०९ माहे १२ सन २०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्याया, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्याया, पनवेल**

---

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे : हरिश्चंद्र पिंपळे, उरण, रायगड येथील सर्व्हे नं.९, क्षेत्रफळ १.४७.०० व पो.ख. ०.०८.३० एकूण क्षेत्र १.५५.३० हे.आर.चौ.मी. पैकी क्षेत्र ०.३०.०० हे.आर.चौ.मी. ही मिळकत शेतजमीन आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) शारदा मनोहर म्हात्रे, २) संगीता प्रसाद पाटील, ३) नरेश तुकाराम घरत यांचेकडून कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व त्या मिळकतीचे व्यवहाराबाबत विद्यमान मालकांबरोबर बोलणेही झालेले आहे.

सबब, सदरहू शेतजमिनी बाबत कोणाही व्यक्तीचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, दान, गहाण, बोजा, लीज, फरोक्तखत असल्यास तसेच त्यांची आमचे अशिलांच्या मुळ मालकांबरोबरच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधित इसमांनी अगर संस्थांनी लेखी हरकत सदरची नोटी प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत लेखी स्वरुपात व पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे त्यांचे नमूद पत्यावर कळवावी.

वरील मुदतीत कसल्याही प्रकारची हरकत खालील सही करणार यांचेकडे लेखी स्वरुपात न आल्यास वरील नमूद जमीन मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील वर्णनाच्या मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व व्यवहारानंतर कोणी कुठल्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

कळावे.

दि.०६/१२/२०२१

**सही/-**
**श्री.विलास देवराम पवार**
**ॲडव्होकेट**
**ऑफिस नं.४९, बिल्डींग नं.३, नगरपालिका**
**शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी चौक, पनवेल**
**मो.नं.९९३०२५३५४५**

---

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत जमीन मालक विनायक गुरुनाथ जगे, रा.पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांजकडून सदर मिळकत कायम स्वरुपी विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वाजे, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| ६८ | २ | ०-६५-२०<br>पो.ख. ०-००-०० | १०.६१ |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणताही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आपल्या हक्क व हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

पनवेल
दि.०९/१२/२०२१

**सही/-**
**ॲड.निलेश डी. हातमोडे**
**शॉप नं.७, कनक सरोवर, जुना**
**ठाणा नाका रोड, प्रांत ऑफिसजवळ,**
**पनवेल-४१०२०६, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८१०८५५८२८९/७९७७८९९२९०**

---

अर्जदाराचे वकील ॲड.अक्षय भोईर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज क्र.८१०/२०२१

श्री.सुरेश शामा पाटील
वय : ५७ वर्षे, धंदा : शेती
रा.२३९, कृष्ण मंदिराजवळ, तळोजा मजकूर,
पो.तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.संभू कान पाटील रा.२३९, कृष्ण मंदिराजवळ तळोजा मजकूर, पो.तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड यांचा मृत्यू दि.०७/०४/१९४७ रोजी झालेला आहे. परंतु मृत्यूची नोंद ग्रामपंचायत कर्नाळा येथे मृत्यू नोंदणी पुस्तिकेत मृत्यूची नोंद केलेली नाही. तरी ती करून मिळावी याकरिता अर्जदार यांनी 'उशिरा मृत्यूनोंदी'चा आदेश मिळावा यासाठी पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

आज दि.०९/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**

---

मा.सोनावणे सो यांचे कोर्टात

ॲड.सुनित पाटील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दिवाणी किरकोळ अर्ज नं.१७८४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१७/०१/२०२२

१) श्रीमती.दमयंती जोगिंद्र डकुआ
रा.बिल्डींग नं.२५, रुम नं.७३१, सी.जी.एस.कॉलनी,
से.७, एस.एम.रोड, कल्पक इस्टेट जवळ,
वडाळा (पू) अन्टॉपहिल-४०००३७
२) श्रीम.सबरनी मनोजकुमार डकुआ
रा.बिल्डींग नं.१०७, रुम नं.४०३७,
सी.जी.एस.कॉलनी, से.७, मुंबई-४०००३७ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार नं.१ यांचे पती, अर्जदार नं.२ यांचे वडील कै.जोगिंद्र नारायण डकुआ मयत यांचे दि.२०/०४/२०२१ रोजी कम्युनिटी हेल्थ सेंटर, हिंजलीकर येथे निधन झाले. सदर मयताच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**रुम नं.१०३, १ ला मजला, साई आशिष, प्लॉट नं.१४८, से.४,**
**करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई-४१०२०६**
**क्षेत्रफळ : ११.८४७ स्क्वे.मी.**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारसदाखला मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावे.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारसदार म्हणून जाहीर करील व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.९ माहे डिसेंबर २०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## घरफोडीत रोख रकमेसह मोबाईल लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घराच्या दरवाजा लगत असलेला पत्रा वाकवून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश करून घरात ठेवलेली रोख रक्कम व मोबाईल फोन लंपास केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

शहरातील नवनाथ नगर झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या ललितकुमार गुप्ता यांच्या घरामध्ये अज्ञात चोरट्यांनी दरवाजा लगत असलेला पत्रा वाकवून प्रवेश करून घरात असलेले ५० हजार रुपये रोख रक्कम व मोबाईल फोन असा ऐवज चोरुन नेला आहे.

### शुद्धीपत्रक

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, श्री.निलकंठ जगन्नाथ कोळी रा.कोंबडभुजे, पोस्ट : उलवे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाची जाहीर नोटीस दि.२८/११/२०२१ रोजी दैनिक रायगड नगरी पेपरमध्ये प्रकाशित करण्यात आलेली असून सदर नोटीसीमध्ये वर नमूद शेतकऱ्याकडून माझे अशिल मेसर्स मयुर बिल्डर अ‍ॅण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रा.श्री.अरुण मोहन पाटील, रा.शॉप नं.२७, घर नं.१३३९/४०, श्री विघ्नहर्ता अपार्टमेंट, सेक्टर ७, कोपर खैरणे, नवी मुंबई ४००७०९ सदर मालमत्ता १४०.०० चौ.मी. पैकी ५० टक्के अविभाज्य भाग हस्तांतरीत, विकत, त्रिपक्षीय करारनामा करत असून सदर जाहीर नोटीसमध्ये माझे अशिलांचा नजर चुकीने उल्लेख करण्याचे राहून गेले होते. त्याबाबतचे सदर शुद्धीपत्रक देण्यात येत आहे. सदर मालमत्ता तपशिल

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक KOM-ICIG-64**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक (वहाळ) | २५ ए | ३२ | १४०.०० चौ.मी. पैकी ५० टक्के अविभाज्य भाग |

**सही/-**
**अ‍ॅड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२,**
**खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

अर्जदारांकरिता अ‍ॅडव्होकेट : अ‍ॅड.उदय प्र. मोकल

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
क्रिमिनल एम. ए. नं.११६९/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१२/०१/२०२२

सौ.अंजली संजय त्रिपाठी — अर्जदार
विरुद्ध
निबंधक जन्म व मृत्यू नोंदणी अधिकारी — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांची मुलगी कु.निधी संजय त्रिपाठी हिचा जन्म दि.१६/१०/२००७ रोजी नील क्लिनीक, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे. कु. निधी संजय त्रिपाठी हिचा जन्माचा दाखला मिळणेकरिता वरील अर्जदार यांनी पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

सदरबाबत अर्जदार यांस जन्माचा दाखला देण्यास कुणाची हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाची आहे. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केली नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे जन्माचा दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ९/१२/२०२१

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

मे.सोनावणे साहेब कोर्ट
अर्जदाराचे वकील
अ‍ॅड.मेहबुब गै. पटेल

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१८५८/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२४/०१/२०२२

१) श्री.संजय यशवंत कांडपिळे
वय : ६३ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.मातृपितृ छाया, पोदी नं.१, एस.पी.मोरे कॉलेजजवळ,
सेक्टर १५, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.अजय यशवंत कांडपिळे
वय : ६० वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.पर्ल होम्स बिल्डींग, प्लॉट नं.४१३, के मॉल जवळ,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ व २ यांचे वडील कै.यशवंत गंगाराम कांडपिळे हे दि.३०/०५/२०१७ रोजी मयत झाले असून कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांच्या नावाने मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत असून सदर मिळकत महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत करण्यात आली असून सदर मिळकतीचे अ‍ॅवार्ड हे कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांचे नांवे आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.नं. | मौजे | युनिट केस नं. | स.नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पनवेल | पनवेल -३८३/ब | ३०५/२+३+३०६ ते ३१०+३११/१ +३११/३+३१२/२ | १६<br>२२ | १२४४.४<br>१२२४.०<br>२४६८.४ | २.१६<br>२.४४<br>४.६० |

येणेप्रमाणे वर नमूद मिळकतीच्या अनुषंगाने कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांचा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदारांचे हक्काबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास अथवा वारसदाखला देण्यास कोणतीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार जर कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांचे वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.०७/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# सामान्य नागरिक काँग्रेसच्या पाठीशी ठामपणे उभा राहील : चारुलता टोकस

**दै.रायगड नगरी । पेण**

राष्ट्रीय काँग्रेसचे पेण शहर अध्यक्ष प्रवीण पाटील यांच्या पुढाकाराने सुरू करण्यात आलेल्या काँग्रेस मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन महाराष्ट्र काँग्रेस प्रदेश उपाध्यक्षा चारुलता टोकस व जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बापूसाहेब नेने, उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी चारुलता टोकस, रायगड जिल्हा सहप्रभारी श्रीरंग बरगे,जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत पाटील, तालुका अध्यक्ष अशोक मोकल, पेण शहरअध्यक्ष प्रवीण पाटील, हिदायतुल्ला कुवारे, प्रकाश मोकल यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



भारतीय जनता पक्ष समाजात तेढ निर्माण करून राजकारण करीत आहे इंग्रजांच्या फोडा आणि राज्य करा या नीतीचा अवलंब करून भाजपा सामाजिक वातावरण दूषित करून स्वतःचे राजकीय हीत साधत असल्याचा आरोप काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षा चारुलता टोकस यांनी शहराध्यक्ष प्रवीण पाटील यांच्या पुढाकाराने पेण येथे सुरु झालेल्या काँग्रेस कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी केला.

त्या पुढे म्हणाल्या की भाजपने निवडणुकीच्या वेळी जनतेला दिलेला कोणताही वचन पाळला नाही. सुज्ञ मतदार राजाला भाजपची कुठनीती लक्षात आली असून सामाजिक स्वास्थ व देशाच्या खऱ्या अर्थाने प्रगती करिता आगामी निवडणुकांमध्ये सामान्य नागरिक काँग्रेसच्या पाठीशी ठामपणे उभा राहील असा आत्मविश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. निवडणुकीतील यश अपयश हे तात्पुरता असतं परंतु काँग्रेस ही एक विचारधारा आहे व ती जिवंत ठेवण्याचे काम प्रवीण पाटील यांच्यासारख्या काँग्रेस कार्यकर्त्यांनी निष्ठेने केले आहे असे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत म्हणाले की, काँग्रेसचा सच्चा कार्यकर्ता आजयही काँग्रेसच्याच सोबतच आहे. काँग्रेससाठी लवकरच पुन्हा सुगीचे दिवस येणार असल्याचा दावा त्यांनी वेळी केला. तसेच काँग्रेस कार्यकर्त्यांनी तळागळातील सर्वसामान्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडण्याकरिता कामाला लागा असा आदेशही त्यांनी यावेळी दिला. काँग्रेसचे शहर अध्यक्ष प्रवीण पाटील यांचा जनसंपर्क दांडगा असून आगामी निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाला त्याचा निश्चितच लाभ होणार आहे असे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत म्हणाले यात्रसंगी आर्मी चीफ सीडीएस बिपिन रावत यांच्यासह हेलिकॉप्टर अपघातात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

## मासळी विकताना कायम मास्कचा वापर करा : अ‍ॅड. मानसी म्हात्रे



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आपली मासळी ग्राहकांना विकताना कायम मास्कचा व पैसे घेत व देत असल्याचे हातही स्वच्छ ठेवा, राज्यात ओमीक्रोन चा धोका असल्याने बाजारात पर्यटक मोठ्या संख्येने येतात म्हणून आपली व कुटूंबाची काळजी घ्या, अधिक सुरक्षा बाबत आपले रायगड भूषण जयपाल पाटील सांगतील असे उद्घाटन प्रसंगी आपले विचार मांडले.

प्रारंभी पी.एन.पी.मार्केटच्या अध्यक्ष गीतांजली पेरेकर यांनी उपनगराध्यक्ष, जयपाल पाटील, सावतामाळी पत संस्थेचे अध्यक्ष रमेश नाईक, माजी नगरसेवक आर.के.घरत, पत्रकार सचिन पावसे, आपत्ती व सुरक्षा मित्र पूजा पेडणेकर यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी जयपाल पाटील यांनी स्वयंपाक घरातील गैस ची सुरक्षा,विजेची सुरक्षा, मुलाची सुरक्षा व पाणी वापराची सुरक्षा ची माहिती दिली आणि सरकारी व नगरपालिकेच्या सूचना चे काटेकोर पालन करा असे सांगून अपघात व बाळतपणा साठी १०८ रुग्ण वाहिका चा वापर कसा करायचा यासाठी तिला कॉल करताच २० मिनिटात डॉक्टर जयप्रकाश पांडे व पायलट स्वप्नील म्हात्रे उपस्थित राहिले.

हा कार्यक्रम यशवी करण्यास संध्या पेरेकर, नयना तांडेल, पूनम तबिब, नयना कोरलेकर, भारती रामनाथकर, गीता मुकादम, दत्ता तांडेल, रंजिता पाटील, आपत्ती व सुरक्षा मित्र विकास रणपिसे, सोगावकर, मंगेश राऊत, सुरेश खडपे, प्रसाद ठाकूर पत्रकार सचिन पावसे, पूजा पेडणेकर यांनी परिश्रम घेतले, रायगडचा युवक फॉउडेशनतर्फे मासळी विक्रेता व ग्राहक २०० जणांना मोफ़त मास्कचा वाटप करण्यात आले,शेवटी आभार विनोद उंदिरे यांनी मानले.

अर्जदारातर्फे वकील : अ‍ॅड.मारिया कोळी

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) साहेब यांचे न्यायालयात, उरण
दि.चौ.अर्ज क्र.१५/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१५/०१/२०२२

श्री.प्रभाकर रामभाऊ पाटील
रा.पाणजे, ता.उरण,
जि.रायगड, पिन नं.४००७०६ — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै. आयतुबाई उर्फ सुमती रामभाऊ पाटील रा.पाणजे, ता.उरण, जि.रायगड येथे दि.०२/०१/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. कै.आयतुबाई उर्फ सुमती रामभाऊ पाटील यांचे वडिलोपार्जित मालकीची व ताबे कब्जे वहिवाटीतील शेत जमीन मिळकत खालीलल वर्णन केलेल्याप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| युनिट केस क्र. | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| फुंडे/१९४/५६० | १० | ७ अ | ०-५-८ |
| | १८ | १ ब | ०-७-१ |
| | १०३ | ५ अ | ०-७-० |
| | ११२ | २ अ | ०-७-१ |
| | १५१ | १ अ | ०-९-७ |
| फुंडे/१९८/२७३ | १५५ | ३ ब | ०-५-० |
| फुंडे/२३१ | ४५ | ६ अ | ०-६-१ |
| | ५९ | ४ ब | ०-५-६ |
| | ७१ | १३+१४ अ | ०-३-८ |
| फुंडे/४/१५ | ३७ | १५ | ०-११-७ |
| फुंडे/१४६ | ८२ | २ ब | ०-१४-५ |
| | ९९ | ७ अ | ०-८-६ |
| डोंगरी/५२ | १६ | २८ | ०-१२-० |
| | २१ | १५ | ०-५-० |
| | २३ | ११ | ०-८-० |
| | २७ | ४ अ | ०-५-६ |
| पाणजे/१२९/८६ | ११ | १९ | ०-६-० |


वरील मिळकतीच्या कै.आयतुबाई उर्फ सुमती रामभाऊ पाटील यांच्या सहमालकी हक्काच्या असून त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार मिळण्यास पात्र आहेत. वर वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत लेखी अथवा तोंडी हरकती योग्य त्या कागदोपत्री पुरावयास मे.न्यायालयात दाखल कावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकती दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून, पुरावा घेवून मे.न्यायालयात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान केले जाईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. आज रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयात यांचे शिक्क्यानिशी दिले.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**

# पालकमंत्री कु.आदिती तटकरेंचे जिल्ह्यातील आदिम जमातीच्या विकासाकरिता यशस्वी पाऊल

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्यातील आदिम जमाती (कातकरी, कोलम व माडीय गोंड) करिता जिल्ह्यातील मौजे जांभूळपाडा, ता.सुधागड येथील स.नं.१०६ क्षेत्र १९-७५-०० हे.आर. या जागेवर बहुउद्देशीय संकुल उभारण्यासाठी शासनाने मान्यता दिली होती. मात्र जांभूळपाडा येथील स.नं.१०६ क्षेत्र १९-७५-०० हे.आर. ही प्रस्तावित जागा राखीव वनक्षेत्र यामध्ये असून भूसंपादनाला विलंब होत असल्याने प्रस्तावित संकुलासाठी पर्यायी जागांचा शोध घेण्यात येत होता.



त्यानुसार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांनी उपलब्ध पर्यायांची पाहणी केली. पाली सुधागड तालुक्यातील वऱ्हाड, जांभूळपाडा येथून ८ किलोमीटर अंतरावर असलेल्या माणगाव खुर्द येथील सर्व्हे नं.७१, ७६ व ७७ येथील गुरचरण असलेली जागा प्रस्तावित प्रकल्पासाठी योग्य असून रायगड जिल्हाधिकारी यांच्यामार्फत विनामोबदला प्रकल्पासाठी हस्तांतरीत करण्यात येणार असल्याचा अहवाल त्यांनी सादर केला होता.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी प्रस्तावित प्रकल्प सुधागड तालुक्यातील मौजे जांभूळपाडा ऐवजी मौजे माणगाव खुर्द येथील शासकीय जमीन निश्चित करुन सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्याची विनंती शासनास केली होती.

या विनंतीला अनुसरून शासनाने जिल्ह्यामधील सुधागड तालुक्यातील मौजे जांभूळपाडा ऐवजी मौजे माणगाव खुर्द येथे बहुउद्देशीय संकुल उभारण्यासाठी मान्यता दिली आहे.

या प्रकल्पाकरीता मौजे माणगाव खुर्द येथील स.नं.७१ क्षेत्र ६.१५.० हे.आर., स.नं.७६ क्षेत्र ५.०६.० हे.आर. व स.नं.७७ क्षेत्र ६.७६.० हे.आर. येथील गुरचरण असलेल्या जमिनी प्रकल्पाकरिता प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांच्याकडे जिल्हाधिकाऱ्यांनी विनामोबदला हस्तांतरीत करण्याचे सूचित केले असून या प्रकल्पासाठी जमीन उपलब्ध झाल्यानंतर मुख्य अभियंता, बांधकाम व्यवस्थापन कक्ष, आदिवासी विकास विभाग यांनी प्रकल्पाचे आराखडे व अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही तात्काळ हाती घ्यावी, असेही शासनाने दि.०७ डिसेंबर २०२१ च्या शासन निर्णयाद्वारे कळविले आहे.

मा.गोडसे सो
प्रो.जमा रु.५०/- — अर्जदार तर्फे वकील : अ‍ॅड.श्री.मनोज म्हात्रे, अ‍ॅड.ज्योती सरोदे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१७६३/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२१/०१/२०२२

१) श्री.दिनेश रामचंद्र मोरे
वय : ५७ वर्षे, धंदा : नोकरी
रा.अशोका गार्डन को.ऑप.हौ.सो.,
ए-२ विंग, फ्लॅट नं.७, तिसरा मजला,
टिळक रोड, गोदरेज प्लाझा जवळ,
पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड
२) कै.राजेश रामचंद्र मोरे
(मयत तर्फे वारस पत्नी)
२/१) श्रीम.शिवानी राजेश मोरे
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.११०१/११०२, धोबी आळी,
कोळीवाडा, मराठी शाळेजवळ, पनवेल,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड
३) वीणा रामचंद्र मोरे विवाहानंतरचे नाव
वीणा सुमेश राऊत
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.५१, इंदुविला, डॉ.एम.बी.राऊत रोड,
बालमोहन स्कूल, पीओ भवानी शंकर, दादर,
व्हीटीसी मुंबई, जिल्हा : मुंबई, पिन नं.४०००२८ — अर्जदार

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ व ३ यांचे वडिलांचे वडील आणि अर्जदार क्र.२/१ यांच्या पतीच्या वडिलांचे वडील कै.त्रिंबक केशव मोरे यांचा मृत्यू दि.२६/०१/१९८७ रोजी आजारपणामुळे राहते घर धोबी आळी पनवेल येथे झालेला आहे. आणि अर्जदार क्र.१ व ३ यांचे वडील व अर्जदार क्र.२/१ यांच्या पतीचे वडील कै.रामचंद्र त्रिंबक मोरे यांचाही मृत्यू दि.०७/०८/२०१९ रोजी ०७, तिसरा मजला, अशोका गार्डन ए-२/७, टिळक रोड, पनवेल (मनपा), पनवेल-रायगड येथे झालेला असून, कै.रामचंद्र त्रिंबक मोरे हे हयात असताना त्यांचे वडील कै.त्रिंबक केशव मोरे यांच्या नावाने व मालकी हक्कात खालील जमीन मिळकतीसह घराची मिळकत आहे. सदरहू कै.त्रिंबक केशव मोरे यांच्या नावे पनवेल महानगरपालिका हद्दीत जमीन मिळकतीसह घराच्या मिळकती आहेत त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**अ) जमिनीसह घर मिळकतीचे वर्णन**
**पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| झोन क्र. | पत्ता | इमारत क्र./ मालमत्ता क्र. | वापर | कर योग्य मुल्य रु. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| Z | ११०१, कोळीवाडा, पनवेल-४१०२०६ | V2Z5003650/1 | निवासी | रु.१३७०/- | कै.त्रिंबक केशव मोरे |
| Z | ११०२, कोळीवाडा, पनवेल-४१०२०६ | V2Z5003651/1 | निवासी | रु.३८८८/- | कै.त्रिंबक केशव मोरे |

वरील वर्णनाच्या जमीन मिळकतीवर असलेल्या घर नं.११०१ आणि घर नं. ११०२ या दोन घराच्या घरपट्टी आणि असेसमेंट उताऱ्यावर मालकाचे नाव या सदरी पनवेल महानगरपालिकेच्या कार्यालयामध्ये कै.त्रिंबक केशव मोरे यांच्या नावाची नोंद आहे. कै.त्रिंबक केशव मोरे यांचा मुलगा कै.रामचंद्र त्रिंबक मोरे त्यांच्या मृत्यूनंतर सर्व अर्जदार हे कै.रामचंद्र त्रिंबक मोरे यांचे हिश्याकरिता कायदेशीर वारसदार आहेत.

वरील घराच्या संदर्भात अर्जदार यांना वारस दाखला मिळणेकरिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांना वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.०६/१२/२०२१ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्याने दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

मा.गोडसे सो
प्रो.जमा रु.५०/- — अर्जदार तर्फे वकील : अ‍ॅड.श्री.मनोज म्हात्रे, अ‍ॅड.ज्योती सरोदे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१७५८/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२१/०१/२०२२

१) श्री.प्रदीप कृष्णा मोरे
वय : ६४ वर्षे, धंदा : रिक्षा चालक
रा.घर नं.११०१, धोबी आळी, कोळेश्वर
विद्यामंदिराजवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
२) अलका कृष्णा मोरे विवाहानंतरचे नाव
दिपा दिवाकर कातारे
वय : ६२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.जि/२५, शिवमती अपार्टमेंट छत्रपती शिवाजी मार्ग,
दत्त मंदिर जवळ, भाईंदर (प), जि.ठाणे पिन नं.४०११०१
३) वासंती कृष्णा मोरे विवाहानंतरचे नाव
स्नेहल यतीन कोशे
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.वाणी आळी, उपासना अपार्टमेंट, ता.उरण, जि.रायगड
४) सोनल संजय मोरे
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.३०१, पुष्पव्हिला बिल्डींग, प्लॉट नं.६३, सेक्टर ४,
मस्जिद जवळ, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
५) अभिलाषा संजय मोरे
वय : २१ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.फ्लॅट नं.३०१, पुष्पव्हिला बिल्डींग, प्लॉट नं.६३, सेक्टर ४,
मस्जिद जवळ, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
६) अविनाश कृष्णा मोरे
वय : ५४ वर्षे, धंदा : फोटोग्राफी
रा.घर नं.११०१, धोबी आळी, कोळेश्वर
विद्यामंदिराजवळ, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१, २, ३ व ६ यांचे वडिलांचे वडील आणि अर्जदार क्र.४ यांच्या पतीचे वडील व अर्जदार क्र.५ यांचे आजोबा कै.त्रिंबक केशव मोरे यांचा मृत्यू दि.२६/०१/१९८७ रोजी आजारपणामुळे राहते घर धोबी आळी पनवेल येथे झालेला आहे. कै.त्रिंबक केशव मोरे यांचा मुलगा कै.कृष्णा त्रिंबक मोरे यांचा मृत्यू दि.२७/०९/२०१२ रोजी धोबी आळी, ता.पनवेल येथे झालेला असून कै.कृष्णा त्रिंबक मोरे हे हयात असताना त्यांचे वडील कै.त्रिंबक केशव मोरे यांच्या नावाने व मालकी हक्कात खालील जमीन मिळकतीसह घराची मिळकत आहे. सदरहू कै.त्रिंबक केशव मोरे यांच्या नावे पनवेल महानगरपालिका हद्दीत जमीन मिळकतीसह घराच्या मिळकती आहेत. त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**अ) जमिनीसह घर मिळकतीचे वर्णन**
**पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| झोन क्र. | पत्ता | इमारत क्र./ मालमत्ता क्र. | वापर | कर योग्य मुल्य रु. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| Z | ११०१, कोळीवाडा, पनवेल-४१०२०६ | V2Z5003650/1 | निवासी | रु.१३७०/- | कै.त्रिंबक केशव मोरे |
| Z | ११०२, कोळीवाडा, पनवेल-४१०२०६ | V2Z5003651/1 | निवासी | रु.३८८८/- | कै.त्रिंबक केशव मोरे |

वरील वर्णनाच्या जमीन मिळकतीवर असलेल्या घर नं.११०१ आणि घर नं. ११०२ या दोन घराच्या घरपट्टी आणि असेसमेंट उताऱ्यावर मालकाचे नाव या सदरी पनवेल महानगरपालिकेच्या कार्यालयामध्ये कै.त्रिंबक केशव मोरे यांच्या नावाची नोंद आहे. कै.त्रिंबक केशव मोरे यांचा मुलगा कै.कृष्णा त्रिंबक मोरे त्यांच्या मृत्यूनंतर सर्व अर्जदार हे कै.कृष्णा त्रिंबक मोरे यांचे हिश्याकरिता कायदेशीर वारसदार आहेत.

वरील घराच्या संदर्भात अर्जदार यांना वारस दाखला मिळणेकरिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांना वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.०६/१२/२०२१ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्याने दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## अज्ञात लोकलच्या धडकेने इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात लोकलची धडक लागून गाडीच्या खाली येवून एका इसमाचा मृत्यू झाला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत. सदर अनोळखी इसम हा खांदेश्वर ते पनवेल रेल्वे कि.मी. नं.४६/१३ ते ४६/१४ च्या दरम्यान जात असताना अप अज्ञात लोकलची ठोकर त्याला लागून त्यात तो जखमी होवून मृत्यू पावला आहे. सदर अनोळखी इसम हा मुस्लीम पुरुष असून वय ४० वर्षे, उंची ५ फूट ५ इंच, अंगाने मध्यम, रंग निम गोरा, चेहरा गोल, नाक सरळ, केस काळे, डोळे काळे आहेत. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे दूरध्वनी ०२२-२७४६७१२२ किंवा सहा.पोलीस निरीक्षक पी.एम.कांबळे मो.नं. ९८७०५९४०८१ येथे संपर्क साधावा.

## एशियन थाई बॉक्सिंग चॅम्पियन स्पर्धेत सुवर्ण पदक पटकाविल्याबद्दल अनुज भोसले याचा केला शिवसेनेने सत्कार



**दै.रायगड नगरी । पनवेल**

हैद्राबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या एशियन (आशिया खंड) थाई बॉक्सिंग चॅम्पियनशीप २०२१ या स्पर्धेमध्ये कु.अनुज संजय भोसले यांनी भारताचे प्रतिनिधीत्व करत सुवर्णपदक मिळवले त्यानिमित्ताने शिव-सेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी सत्कार केला व त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, महानगर समनव्यक गुरुनाथ पाटील, उपमहानगर प्रमुख यतीन देशमुख, खारघर शहरप्रमुख प्रकाश गायकवाड, उपशहरप्रमुख ज्ञानेश्वर भंडारी, संजय भोसले, नवीन पनवेल उप विभाग प्रमुख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# नेरळ गुन्हे प्रकटीकरण पथकाची दमदार कामगिरी, चोरी करणाऱ्या २ महिलांना ८ दिवसात बेड्या

**दै.रायगड नगरी । नेरळ**

नेरळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत येत असलेल्या मोहाचीवाडी येथे भांडी विक्रीसाठी आलेल्या २ महिलांनी समाधान चाळ आणि साईमंदीर परीसरातील सुमारे १८ ते २० महिलांची फसवणूक केल्याची घटना घडलीये. आमच्या घरातून सोन्या चांदीचे दागिने चोरले असल्याची तक्रार गावातील महिलांनी नेरळ पोलीस दाखल केली होती.

या तक्रारीची दखल घेत नेरळ पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने ३ दिवसात या गुन्ह्याचा तपास लावत या दोन महिलांना बेड्या ठोकल्या आहेत. गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सचिन गावडे आणि त्यांच्या टीमने केलेल्या दमदार कामगिरीमुळे त्यांचं सर्वत्र कौतुक होत आहे. चोरी करणाऱ्या या महिलांच्या नावावर १३ गुन्हे दाखल असल्याचे या तपासात समोर आले आहे. नेरळ गुन्हे शाखेने या महिलांना ८ दिवसात अटक करून दमदार कामगिरी केली आहे. त्यांच्याकडून सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्यांना १ वर्षाची शिक्षा आणि प्रत्येकी १८ हाजारांचा दंड ठोठावण्यात आलाय.



नवीन भांडे विक्री करणा-या या दोन महीलांनी जुन्या भांड्यांच्या बदल्यात नवीन भांडी देण्याचे सांगुन गावातील महीलांच्या सोने चांदीच्या दागिन्यांची चोरी केली. चोरी झालेल्या सामानाची एकूण किंमत १ लाख ६७ हजार ९०० रुपये इतकी असुन या महिलांकडून हा सर्व माल पोलिसांनी जप्त केला आहे.

या गुन्हयाचा तपास नेरळ गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सचीन गावडे आणि त्यांच्या टीमने केला आहे. सीसीटीव्ही फुटेजचा आधार घेत तसेच तांत्रीक पुरावे वापरून पोलिसांनी या महिलांचा शोध लावला आहे. २१ वर्षीय सुलेखा नयासाल मल्हार आणि ३६ वर्षीय सिमा श्यामसुंदर मल्हार अशी या महिलांची नावे आहेत. या महिला मध्यप्रदेश मधील असून त्या सध्या देहूरोड येथे राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे नेरळ पोलिसांनी देहुरोड पुणे येथुन या महिलांना ताब्यात घेऊन अटक केले आहे. या महिलांनी आपणच गुन्हे केले असल्याची कबुली दिली असून गुन्हयातील फिर्यादी आणि सा-क्षीदार यांचा चोरीस गेलेला सर्व मुददेमाल देहुरोड येथुन हस्तगत करण्यात आला आहे. न्यायालयाने या महिलांना १ वर्षाचा कारावास आणि १८ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

रायगडचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे आणि उपविभागीय पोलीस अधीकारी विजय लगारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर, पोलीस उपनिरीक्षक सचीन गावडे, सहा.फौजदार गणेश गिरी, पोलीस हवालदार नवनाथ म्हात्रे, पोलीस नाईक संदीप चव्हाण यांनी हि कामगिरी पार पाडली आहे. या गुन्ह्याचा जलदगतीने तपास करून मुद्देमाल परत केल्याबद्दल फिर्यादी यांनी नेरळ पोलिसांचे आभार मानले आहेत.

# महापौर किशोरीताई पेडणेकर यांच्या बद्दल केलेल्या बेताल वक्तव्याचा शिवसेना महिला आघाडीने केला निषेध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुंबईच्या प्रथम नागरिक, महापौर, तसेच रायगड जिल्हा महिला संपर्क संघटिका सौ.किशोरीताई पेडणेकर यांच्यावर भारतीय जनता पक्षाचे आमदार आशिष शेलार यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत महाराष्ट्राच्या अस्मितेला काळीमा फासणारे जे बेताल वक्तव्य केले. त्या वक्तव्याचा निषेध नवीन पनवेल शिव-सेना महिला आघाडीतर्फे करण्यात आला आहे.




या संदर्भात निषेध करून खांदेश्वर पोलिसांनी त्वरित योग्य ती कारवाई करण्यासाठी, नवीन पनवेल महिला शहर संघटिका सौ.अपूर्वा प्रभू यांनी पनवेल महिला आघाडीच्या वतीने खांदेश्वर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष कोकाटे यांच्याकडे निवेदन देऊन तक्रार नोंदवली. यावेळी तालुका संघटिका सौ सुजाता कदम, उपमहानगर संघटिका नवीन पनवेल मंदा जंगले, उपशहर संघटिका नवीन पनवेल सुगंधा शिंदे, उपशहर संघटिका सौ. माया देवडे, विभाग संघटिका सौ. शारदा सुरवसे आणि वैशाली घाग उपस्थित होत्या.

# आईसह मुलगी बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एका महिलेने आपल्या लहान मुलीला घेवून कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

कळंबोली वसाहतीमधील केएल-५, सेक्टर ३ येथे राहणारी सकीना जमील शहा (२३) व त्यांची एक वर्षाची मुलगी हलीमा ह्या दोघी हरविल्याची तक्रार देण्यात आली आहे. सकीना यांची उंची ५ फूट, रंग गहुवर्णीय, भाषा हिंदी, केस काळे लांब, डोळे काळे, नाक सरळ, बांधा मध्यम, चेहरा गोल असून अंगात गुलाबी रंगाची सलवार सुट व सोबत ओप्पो कंपनीचा मोबाईल फोन आहे. तर हलीमा हिचा रंग गोरा आहे. या दोघांबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे किंवा पो.ना.सुनील मासुळ यांच्याशी संपर्क साधावा.



# उमेश चौधरी यांच्या राग 'यमन' च्या अनोखी गायन किमयाने शास्त्रीय संगीत मैफलीत रंगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आग्रा घराण्याचे प्रख्यात गायक रायगड भूषण पंडित उमेश चौधरी यांच्या राग 'यमन' च्या अनोखी गायन किमयाने शास्त्रीय संगीत मैफलीत रंगत आणली. पंडित सदाशिव पवार स्मृतिदिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ वाईच्या वतीने वाई मधील लोकमान्य टिळक संस्थेचे सभागृहात महाराष्ट्राचे ख्यातनाम गायक व रायगडचे सुपूत्र पंडित उमेश चौधरी यांच्या शास्त्रीय संगीत गायनाची मैफिल संपन्न झाली. यावेळी त्यांच्या गायनाने रसिक मंत्रमुग्ध झाले.

पंडित उमेश चौधरी यांनी शिक्षणात पदवीधर, अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाची 'विशारद' पदवी त्यांनी प्राप्त केली आहे. दूरदर्शन, आकाशवाणी तसेच विविध कार्यक्रमात त्यांनी आपल्या सुरमयी कलेने रसिकांना मंत्रमुग्ध केले आहे. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने सुरु असलेल्या मासिक संगीत सभेच्या माध्यमातून पनवेल तालुका सांस्कृतिक सेलचे अध्यक्ष म्हणून त्यांनी शेकडो कलाकारांना व्यासपीठ मिळवून दिले आहे. देशभरात विविध ठिकाणी संगीताचे कार्य करत असताना त्यांनी आपल्या कलेची छाप सोडली आहे, त्यामुळे त्यांचा भीमसेन जोशी गानगंधर्व, रायगड भूषण, रायगड गौरव असे आणि बरेच पुरस्काराने गौरव झाला आहे. त्यांच्या गायनाने संगीत मैफिल प्रफुल्लीत होत असते म्हणून वाई रोटरी क्लबने या संगीत मैफिलीचे आयोजन केले होते.

राग 'यमन'ची विशेषता म्हणजे संगीत शास्त्र प्रणालीला धरून चालणारा राग असून गायकाच्या कल्पकतेतून प्रकटणाऱ्या विविध स्वर समूहांचा रंगोत्सव असतो. या मैफलीच्या निमिताने उस्ताद अस्लम खान यांच्या मार्गदर्शनाची मांडणी पंडित उमेश चौधरी यांनी चांगल्या प्रकारे मेहनतीने सिद्ध केली हे यावेळी पदोपदी जाणवत होते. खयाल विलंबित एकतालातली बंदिश, मध्यलय रचना सखी येरी आली पियाबिना व संगीत सम्राट तानसेन जी समर्पित तरणा बहरदारच होते. बंदिशी प्राचीन परंपरेतली असल्यामुळे संगीत प्रेमीजन जवळ जवळ भारावूनच गेले होते. तद नंतर खास संगीत प्रेमीजनांच्या आग्रहास्तव संत सावता माळी, संत गोरा कुंभार व संत तुकाराम महाराजांच्या अभंगांचा नादब्रह्ममय प्रसादच संगीत प्रेमी जणांना यावेळी मैफलीतून मिळाला. साथ संगत कलाकारांत संवादिनीवर सुरेश फडतरे, पखवाज साथ किरण भोईर तर तबला साथ निषाद पवार यांची होती. तसेच मंगेश चौधरी व अक्षय चौधरी यांची गायन साथ अधोरेखित करणारी होती. त्याचबरोबर या कार्यक्रमात रोटेरिअन डिस्ट्रिक्ट गव्हर्नर स्वाती हेरकळ, रोटेरिअन डॉ. रुपाली अभ्यंकर, रोटेरिअन डॉ. प्रेरणा ढोबळे, रोटेरिअन दिपक बागडे व उस्ताद अझीम खान यांची उपस्थिती संगीत मैफलीची शान वाढविणारीच होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी सागर कांबळे व यश बागुल या दोन युवकांनी तबला जुगलबंदी श्रवणीय सादर केली.



# वरसोली समुद्रकिनारा स्वच्छता अभियान संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने संपूर्ण देशभर आजादी का अमृत महोत्सव साजरा केला जात आहे व याअंतर्गत विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

त्याचाच एक भाग म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नेहरू युवा केंद्र, प्रिझम सामाजिक विकास संस्था, स्वयंसिद्धा सामाजिक विकास संस्था व स्पर्धा विश्व अकॅडमी यांच्या सहाय्याने वरसोली समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी भारतीय सैन्याचे जवान श्री.मयुरेश गावंड, निसर्गप्रेमी तथा सामाजिक कार्यकर्त्या बेला दलाल, स्वयंसिद्धा संस्थेच्या अध्यक्षा तथा स्पर्धा विश्व अकॅडमीच्या संचालिका सुचिता साळवी, तालुका क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर, क्रीडा अधिकारी सचिन निकम, कुस्ती कोच संदिप वांजळे, सिमाली रविंद्र नाईक, बार्टीच्या समतादूत अनुजा पाटील, वरसोली ग्रामपंचायतीचे कर्मचारी तसेच स्पर्धा विश्व अकॅडमीचे युवक-युवती आणि प्रिझम संस्थेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित सर्व युवक-युवतींना जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.रविंद्र नाईक यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित करताना असे प्रतिपादन केले की, युवा पिढी ही देशाची संपत्ती असून, या पिढीने आपल्या आरोग्य कडे लक्ष दिले पाहिजे. नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. तसेच देशाचे सुजाण नागरिक म्हणून देशाच्या विकास कार्यात हातभार लावला पाहिजे. आपला परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे. निसर्गाने आपल्याला भरभरून दिलेले आहे. मात्र त्याचा आपण वापर करताना निसर्गाचे नुकसान होणार नाही याची दखल आपण घेतली पाहिजे. कोकणाला लाभलेला समुद्रकिनारा ही देणगी आहे पण समुद्र किनारा स्वच्छ ठेवणे ही आपली जबाबदारी आहे.

तर नेहरु युवा केंद्राचे जिल्हा युवा समन्वयक निशांत रौतेला आपले विचार व्यक्त करताना म्हणाले की, अभ्यासाबरोबर आपण विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेतला पाहिजे. याचा आपल्याला फायदाच होतो. स्पर्धा विश्व अकॅडमीच्या माध्यमातून उत्कृष्ट भावी अधिकारी घडत आहेत ही एक गौरवाची बाब आहे. यावेळी प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी गोंधळी यांनी उपस्थितांना संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. या स्वच्छता अभियानात साधारणतः १०० विध्यार्थ्यांनी १ तास वरसोली समुद्र किनाऱ्याची स्वच्छता केली.

---

मा.मुजावर साहेब कोर्ट

ॲड.नवनाथ कोकणे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६९३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०१/२०२२

१) रश्मी सितार कर्मावत
वय : २८ वर्षे, धंदा : नोकरी
२) सितार भगवानदास कर्मावत
वय : ५८ वर्षे, धंदा : निवृत्त
३) निलम सितार कर्मावत
वय : ३३ वर्षे, धंदा : नोकरी
४) अंजली सिताराम कर्मावत
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.ओप्प जुलेलाल मंदिर, चेंबुर कॉलनी,
१३ बी, पहिला मजला, गांधी मार्केट,
चेंबुर, मुंबई, महाराष्ट्र-४०००७४ अर्जदार

अर्जदार क्र.१, ३, ४ यांची आई व अर्जदार क्र.२ यांची पत्नी कै.सुरया सितार कर्मावत हे दि.१४/१०/२०२० रोजी चेंबुर, मुंबई येथे मयत झालेले आहेत. सदरहू मयत कै.सुरया सितार कर्मावत यांचे मृत्यूसमयी त्यांचे नाव असलेल्या ५०% टक्के हिस्सा मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**५०% हिस्सा फ्लॅट क्र.७०४, बी विंग, सातवा मजला, श्री शगुन को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी प्लॉट नं.२६८, सेक्टर १०, खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड क्षेत्र ४१.७२ चौ.फूट बिल्टअप (४४९ चौ.फूट)**

वरील मिळकतीबाबत अर्जदार ह्यांनी वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशा कोणत्याही प्रकारची तक्रार, वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत मुदतीत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. ही नोटीस आज दि.९ माहे डिसेंबर रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे सो

ॲड.राजकुमार व्ही. जाधव
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१६५८/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१२/०१/२०२२

(कै.शांताराम गजानन शिलोत्री मयतचे वारस)
श्री.विनायक शांताराम शिलोत्री
वय : ६७ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.ई-२१, श्री शारदा सी.एच.एस.,
महात्मा फुले रोड, गरीबांचा वाडा, डोंबिवली वेस्ट,
कल्याण, विष्णूनगर, ठाणे, महाराष्ट्र ४२१२०२ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. शांताराम गजानन शिलोत्री हे दि.२/४/१९६५ रोजी मु.दादर, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले असून यांची पत्नी कै.गंगाबाई शांताराम शिलोत्री यांचे निधन दि.२४/६/१९९४ साली राहत्या घरी झालेले असून श्री.विनायक शांताराम शिलोत्री ह्यांनी, कै.शांताराम गजानन शिलोत्री यांच्या स्वकष्टार्जित खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : कल्हे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नांव | स.नं./हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| कल्हे | १४० | ०.२३.००<br>पो.ख.०.०५.०० | ०.३४ |

वरील मिळकत ही, कै.शांताराम गजानन शिलोत्री यांच्या स्वकष्टार्जित मालकीची आहे. श्री.विनायक शांताराम शिलोत्री हे, कै.शांताराम गजानन शिलोत्री यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर, कै.शांताराम गजानन शिलोत्री यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.०९/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे सो

प्रो.जमा.६-२५ अर्जदाराचे वकील : ॲड.दिनेश द. पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो.यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१७६८/२०२१
ने.ता.१९/०१/२०२२

कै.नारायण नामदेव भोईर (मयत तर्फे वारस)
१) श्रीमती.जयश्री नारायण भोईर
वय : ६५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.पी.एल-५/३६/७, सेक्टर नं.१७,
पहिला मजला, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.शिल्पा प्रवीण मोकल
वय : ४१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बी.७०२, अंजोर बाणेर रोड, गणराज मंगल
कार्यालय जवळ, बाणेर पुणे शहर पिन नं.४११०४५
३) सौ.प्रिती पृथ्वीराज भगत
वय : ३९ वर्षे, धंदा : नोकरी
रा.घर नं.२०३, धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी कै.नारायण नामदेव भोईर हे दि.०८/०८/२०२१ रोजी पीएल-५/३६/७, सेक्टर १७, सिडको कॉलनी, न्यू पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झालेले आहेत. त्यांचे नावे खालील वर्णनाची सदनिका मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**सदनिकेचे वर्णन**

**पीएल ५/३६/१:७, सेक्टर १७, नवीन पनवेल, क्षेत्र-३३.२० चौ.मी. (बिल्टअप एरिया) पहिला मजला, सिडको कॉलनी, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

यानंतर सदरहू स्थावर मिळकतीस संक्षिप्ततेसाठी ''सदर सदनिका'' असे संबोधण्यात येईल.

कै.नारायण नामदेव भोईर यांचे मृत्यूपश्चात त्यास अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ०९/१२/२०२१ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मे.सोनावणे सो. यांचे कोर्ट

अर्जदाराचे वकील ॲड.सलमान पटेल

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६९०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२९/०१/२०२२

१) श्रीमती.पदीबाई बबल्या पाटील
२) श्रीमती.रंजीता राम पाटील
३) करिश्मा राम पाटील (लग्नानंतरचे)
सौ.करिश्मा योगेश म्हात्रे
४) श्री.अतुल राम पाटील
५) श्वेता राम पाटील
लग्नानंतरचे सौ.श्वेता विकास भोपी
६) श्री.साजेश राम पाटील
अर्जदार क्र.१, २, ४ व ६ रा.मुर्बी गाव, सेक्टर १९,
पोस्ट : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड
अर्जदार क्र.३ रा.घर क्र.४७९, गावदेवी मंदिरा जवळ,
मु.पोस्ट-कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
क्र.५ रा.मु.रिटघर, पो.मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, अर्जदार क्र.१ चा मुलगा व अर्जदार क्र.२ चे पती आणि अर्जदार क्र.३ ते ६ चे वडील कै.राम बबल्या पाटील हे दि.१४/१२/२०२० रोजी मौजे : मुर्बी, पोस्ट : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. कै.राम बबल्या पाटील यांच्या सामाईक मालकीची मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाच्या मिळकती / शेतजमिनी होत्या.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | मौजे | यु.केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तळोजा | ३०६ | ३०३ | १ ब | ०-०५-६ | ०.६१ |
| २ | तळोजा | ३०६ | ३०३ | २ ब | ०-०९-० | ०.९७ |
| ३ | तळोजा | ३०६ | ३०३ | ७ ब | ०-१७-९ | २.०० |

वर वर्णन केलेल्या शेतजमिनीच्या मिळकती सिडकोतर्फे संपादीत झालेल्या आाहेत. सबब सदर संपादीत मिळकतीबाबत कै.राम बबल्या पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर वारस दाखल्याच्या कामी कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारसदाखला दिला जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दि.०९/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**